International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# भारतीय संविधानाचा सरनामा : एक विश्लेषणात्मक अभ्यास

**प्रा. डॉ. संभाजी संतोष पाटील**
*श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य आणि*
*मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे.*
*Corresponding Author – प्रा.डॉ.संभाजी संतोष पाटील*
**DOI - 10.5281/zenodo.10873072**

**प्रस्तावना :**

*राज्यांचा राज्यकारभार ज्या नियमाच्या आधारे चालतो. त्या नियमाला त्या देशाची राज्यघटना असे म्हटले जाते. राज्यघटनेमुळे देशाचा कारभार करीत असतांना राज्यकर्ते कोणत्याही प्रकारची मनमानी करु शकत नाही. त्यामुळे देशातील जनतेवर अन्याय करता येत नाही. जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी सुखी, समृध्दी आणि समाधानी जीवनासाठी संविधान अत्यंत महत्वाचे असते. देशासाठी संविधान असणे महत्वाचे आहे. कारण शासन संस्थेच्या अनियंत्रीत सत्तेला मर्यादीत करणे. तसेच नागरिकांना संविधानाने बहाल केलेले हक्क व स्वातंत्र्य यांचे रक्षण करणे हा संविधानाचा उद्देश असतो. संविधान सत्तेवर असणाऱ्या मर्यादा, सत्ताधिशांचे अधिकार, शासनाच्या विविध अंगामध्ये झालेल्या अविष्काराच्या वाटणीची माहिती देणे तसेच जनतेच्या अधिकारांचे स्पष्टीकरण संविधानात दिलेले आहे. देशाची राजकीय व्यवस्था कोणत्याही प्रकारची असो त्यांना संविधान अगर राज्यघटना असतेच. जर्मन राजकीय विचारवंतांच्या मतानुसार राज्यघटनेशिवाय राज्य असू शकत नाही. घटनेशिवाय राज्याचा राज्यकारभार म्हणजे अराजकता होय. घटनेमुळे राज्याची निर्मिती होत नसते तर राज्य आपल्या दैनंदीन कारभारासाठी आवश्यक असणाऱ्या नियमांची निर्मिती करीत असते. सामाजिक जीवन सुखी होण्यासाठी नागरिकांना आवश्यक असणाऱ्या नियमांची निर्मिती करित असते. सामाजिक जीवन सुखी होऊन नागरिकांना आवश्यक असणाऱ्या हक्कांची हमी राज्य, घटनेच्याव्दारे देत असते. त्यामुळे व्यक्ती विकासाची सर्व दारे उघडी होतात व जनता आपला विकास साधू शकतो. भारताचे संविधान हे सर्वात मोठे व आदर्श स्वरुपाचे आहे. तसेच लिखीत स्वरुपाचे संविधान आहे. भारताचे संविधान तयार करण्यासाठी २ वर्ष ११ महिने १८ दिवस एवढा कालावधी लागला. भारताचे संविधान तयार करित असतांना प्रत्येक विषयावर सखोलपणे चर्चा करण्यात आली आणि या संविधानाच्या सुरुवातीस जी प्रस्तावना आहे. त्यास सरनामा असे म्हटले*

*आहे. काही विचारवंतांच्या मते सरनामा हे भारतीय संविधानाचा आत्मा आहे.*

**संशोधनाची उद्दिष्टे** :

- भारतीय संविधानाच्या सरनाम्याचा अभ्यास करणे.
- भारतीय संविधानाच्या सरनाम्यातील तत्वांची माहिती जाणून घेणे.
- सरनाम्याच्या वैशिष्टयांचा अभ्यास करणे.

**माहितीचे संकलन** :

**भारतीय संविधानाचा सरनामा** :

एक विश्लेषणात्मक अभ्यास करण्यासाठी विविध साधनांचा वापर करण्यात येऊन माहिती संकलीत करण्यात आली आहे. त्या लघुशोध निबंधासाठी, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, साप्ताहिके या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दत**:

भारतीय संविधानाचा सरनामा एक विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

**विषयाचे महत्व**:


भारतीय राज्यघटनेच्या सुरुवातीला आपल्या राज्यघटनेचा सरनामा देण्यात आला आहे. या सरनाम्यास राज्यघटनेचा आत्मा म्हटले आहे. कारण त्यात संपुर्ण राज्यघटनेचे तत्वज्ञान स्पष्ट करण्यात आले आहे. स्वतंत्र भारतात घटनाकार कोणत्या प्रकारचे राजकीय, सामाजिक आर्थिक वातावरण निर्माण करु इच्छित होते. याची जाणिव सरनाम्यावरुन होते. १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडीत नेहरु यांनी संविधान सभेत मांडलेल्या उद्देशपत्राच्या आधारावर आणि अमेरिकन राज्यघटनेच्या धर्तीवर भारतीय संविधानात सरनामा सामील करण्यात आला आहे. भारतीय संविधानाचे तत्वज्ञान मुल्य आदर्श व्यक्त करणारी उद्देशपत्रिका आहे. या सरनाम्याचे भारतीय संविधानात अनन्य साधारण महत्व आहे.

**सरनाम्याचे आधारतत्वे :**

**आम्ही भारतीय जनता** :

भारताची राज्यघटना ही भारतातील लोकांनी तयार केली असून त्यांनी ती मान्य केली आहे. मात्र वास्तविक पाहता राज्यघटना ही घटना समितीने निर्माण केली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेवरुन पुढील गोष्टी स्पष्ट होतात.




घटना समितीमध्ये विविध प्रक्ष गट यांचे प्रतिनिधी, अनुभवी मातब्बर तज्ञ महिला आणि अल्पसंख्याक व्यक्ती यांचा समावेश होता. भारतात प्रथम १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यात. या निवडणुका घटनेनुसार झाल्यात. तसेच देशातील लोकांनी या निवडणुकीमध्ये अगदी उत्साहाने सहभाग घेतला. याचा अर्थ असा भारतीय जनतेला भारतीय घटना समितीने केलेली घटना मान्य होती. भारतीय राज्यघटनेचे लोकांनी स्वागत केले.

**सार्वभौम** :

भारत हे एक सार्वभौम राष्ट्र आहे. दि.१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी, १९५० रोजी भारताची राज्घटना अंमलात आली. याचा उल्लेख सरनाम्यात केला आहे याचा अर्थ भारत अंतर्गत व बाह्य दृष्टीकोनातुन स्वतंत्र आहे. अंतर्गत सार्वभौमत्व म्हणजे भारतीय जनता आता स्वत:साठी कायदा करु शकते. बाहय सार्वभौमत्व म्हणजे भारतीय जनता स्वत:चे परराष्ट्र धोरण ठरु शकते. स्वातंत्र्यानंतर भारत राष्ट्रकुलाचा सभासद होता. त्याचा भारताच्या सार्वभौमत्वावर कोणताही परिणाम होणार नाही. राष्ट्रकुल देशांशी मैत्रीचे संबंध ठेवून त्यांच्याकडुन भारताला अनेक फायदे मिळवून घेता येतील आणि हे सदस्यत्व रद्द करण्याचे भारताला स्वातंत्र्य आहे.

**समाजवाद** :

१९७६ मध्ये ४२ वी घटना दुरुस्ती करण्यात येऊन भारतीय राज्य घटनेच्या सरनाम्यात “समाजवादी” हा शब्द टाकण्यात आला याचा अर्थ आर्थिक, सामाजिक समतेवर आधारीत समाज

निर्माण करणे हा भारताचा उद्देश आहे. समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी समाजवादी या शब्दाची योजना करण्यात आली. १९५५ पासुन भारताने समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न चालू केला आहे त्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात समाजवादी या शब्दाचा अंतर्भाव करण्याच्या उद्दिष्टांबाबत समाधान व्यक्त करण्यात येते. भारतातील गरीब लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी समाजवादी समाजरचना स्थापन केल्याशिवाय पर्याय नव्हता. संपत्ती आणि उत्पन्न यातील विषमता नष्ट करणे, सर्व लोकांना योग्य राहणीमानाचा दर्जा उपलब्ध करुन देणे हा त्यामागचा उद्देश होता. भारतीय समाजवाद खाजगी संपत्ती नष्ट करण्यास सांगत नाही. परंतु खाजगी मालमत्तेच्या नियंत्रणावर भर देते. संपत्ती व कारखान्याचे संपूर्ण राष्ट्रीकरण न करता मिश्र अर्थव्यवस्था करण्यावर भर देतो.

**धर्मनिरपेक्षता** :

१९७६ च्या ४२ व्या घटना दुरुस्तीने हा शब्द भारतीय घटनेच्या सरनाम्यामध्ये समाविष्ट करण्यात आला. भारतीय राज्यघटनेच्या २५ ते २८ या कलमात भारतीय नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क दिला आहे. भारतीय राज्यघटनेत सर्वांना स्वातंत्र्य, समता आणि न्याय प्राप्त करण्याचे आश्वासन दिलेले आहे. भारतीय राज्यघटनेतील कलम १४ प्रमाणे सर्वांना कायद्यापुढे समान मानण्यात येईल. तसेच कलम १५ नुसार धर्म, वंश, जात, जन्मस्थान यांच्या आधारे कोणत्याही प्रकारे भेदभाव केला जाणार नाही. सार्वजनिक संस्था व मंदीर सर्वांसाठी खुल्या असतील तसेच देशातील सर्व नागरिकांना विकासाच्या संधी उपलब्ध असतील आणि सरकारी नोकरीच्या बाबतीत धर्म, वंश, जात, जन्मस्थान या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. भारतासारख्या देशात विविध जाती धर्माचे लोक राहतात. त्यामुळे त्या सर्वांना घटनात्मक संरक्षण देण्याची गरज होती. या सर्वांमध्ये सामजंस्य निर्माण करुन विकासाचा मार्ग आखण्यासाठी सर्वांना समान तत्वावर सर्व धर्म समभाव दाखविणे अत्यंत गरजेचे होते. सर्वांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे आपल्या सद्सद् विवेक बुध्दीप्रमाणे धर्म मानण्याचा त्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचा अधिकार देण्यात आला. सार्वजनिक व्यवस्था नैतिकता व आरोग्य यांना बाधा न आणता प्रत्येक धर्मातील व्यक्तीला धार्मिक संस्था स्थापन करण्याचा त्या संस्थांचे नियमन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. भारतीय राज्यघटना एका धर्मावर ज्याप्रमाणे आधारलेली नाही त्याचप्रमाणे ती धर्मविरोधावर आधारलेली नाही. राज्याचा धर्म म्हणून कोणत्याही एका धर्माला मान्यता देण्यात आली नाही. लोकांना पुजा, अर्चा, श्रध्दा, उपासना इत्यादींचे स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काव्दारे देण्यात आला आहे. या उलट पाकीस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ इत्यादी राष्ट्रांनी धर्माला मान्यता दिली आहे ती धर्मातीत राष्ट्रे आहेत.

**गणराज्य :**

सरनाम्यात म्हटले आहे की, भारत हे एक गणराज्य आहे. शासनाची सर्व सत्ता ही भारतीय लोकांच्या हातात आहे. संविधानाने भारतीय सार्वभौमत्व मान्य केले आहे. भारताच्या राष्ट्रपतींच्या नावाने संपुर्ण देशाचा राज्यकारभार चालतो. भारतीय जनतेकडुन अप्रत्यक्षपणे त्यांची निवड होते. गणराज्य व लोकशाही हे दोन्ही शब्द एकाच नावाने वापरले जातात. परंतु गणराज्य व लोकशाही या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. एखाद्या राज्यात लोकशाही असेल पण तेथे गणराज्य असेलच असे नाही. उदा- इंग्लंडमध्ये लोकशाही आहे पण ते गणराज्य नव्हे कारण तेथील राष्ट्रप्रमख हा लोकांकडुन निवडला जात नाही तर अनुवंशीकतेनुसार तो राजगादीवर येत असतो तो लोकनियुक्त नाही. चीन या देशात गणराज्य व्यवस्था आहे. पण तेथे प्रजासत्ताक पध्दती नाही. तेथे एकपक्षीस साम्यवादी शासन आहे. प्रजासत्ताक गणराज्यात सर्वोच्च अधिकार लोकांच्या हाती असतात व विशिष्ट अशा कालावधीसाठी प्रतिनिधी निवडले जातात.

**न्याय :**

भारतीय संविधानाच्या सरनाम्यात घटनाकारांनी न्यायाचा पुरस्कार केला आहे. आम्हांला सर्वार्थाने न्यायावर आधारीत समाजरचना निर्माण करावयाची आहे. असा समाज निर्माण करावयाचा आहे. जेथे सामाजिक दृष्टीकोनातुन सर्व समान असतील याचा अर्थ जातीवर आधारीत समाजरचना आम्ही समाप्त करणार आहोत. कारण ती सामाजिक न्यायावर आधारीत नाही. आर्थिक विषमता जी अन्यायकारक आहे ती दुर करुन आर्थिक समता निर्माण केली जाईल. विषमतेमुळे होणारे शोषण थांबविले जाईल. राजकीय क्षेत्रात लोकशाही राजकीय व्यवस्था व जीवन पध्दती स्विकारुन राजकीय न्याय प्रस्थापीत करण्याची ग्वाही उद्देशपत्रिका देते, आपल्या देशातील सामाजिक विषमता दुर करुन सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत काही तरतुदी करण्यात आल्या आहे. कलम १५ नुसार सामामजिक समतेचा अधिकार कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्याची तरतुद करण्यात आली आहे. तसेच अल्पसंख्याक, अनुसूचित जाती जमातींना विशेष सवलती राज्यघटनेने दिल्या आहेत. न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी संविधानामध्ये काही उद्दिष्टांचा स्विकार करण्यात आला आहे. त्यात नागरिकांना उपजीवीकेसाठी साधने उपलब्ध करुन देणे, दारिद्रय व बेकारीचे निवारण करणे, नागरिकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावणे, संपत्तीचे योग्य प्रमाणात वाटप करणे इत्यादीव्दारे आर्थिक विषमता कमी करुन नागरिकांना आर्थिक् न्याय देण्याचे उद्दिष्ट राज्यघटनेने स्विकारलेले आहे. भारतीय घटकारांनी ‘‘न्याय’’ या तत्वामुळे व्यक्तीगत हित व सामाजिक हित यांचा सुंदर मेळ घालण्यात आला आहे. व्यक्ती विकास साध्य करीत असतांना घटनाकारांनी सामाजिक हिताकडे लक्ष दिले आहे. राजकीय न्यायाच्या बाबतीत भारतीय नागरिकांना

राज्यकारभारात अप्रत्यक्षपणे सहभागी करुन घेणे होय. प्रौढमताधिकार देऊन निवडणुक लढविण्याचा अधिकार देणे होय.

**स्वातंत्र्य** :

नागरिकांच्या व्यक्तीमत्वाचा विकास साधण्यासाठी स्वातंत्र्यांची गरज असते. भारतीय राज्यघटनेतील कलम १२ ते ३५ मध्ये नागरिकांना मूलभूत हक्क देऊन राज्यघटनेने त्यांना सरंक्षण दिले आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी व्यक्तीस्वातंत्र्य अतिशय महत्वाचे असते. स्वातंत्र्यशिवाय व्यक्तीला आपल्या अनुभवाचा अन्वयार्थ लावण्याची मुभा असू शकत नाही. नागरिकांना स्वतंत्रपणे जगण्याची संधी दिल्यास त्यांच्यातील सदगुण वाढीस लागतील आणि त्यांचा फायदा सर्वांनाच मिळेल. भाषण स्वातंत्र्य आणि मत स्वातंत्र्य, शांततापुर्वक व शस्त्र न बाळगता एकत्रित जगण्याचे स्वातंत्र्य, संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, भारताच्या प्रदेशात कोठेही मुक्त संचार करण्याचे स्वातंत्र्य भारतीय प्रदेशात कोठेही निवास करण्याचे व स्थायीक होण्याचे स्वातंत्र्य कोणताही व्यापार व व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य अशा प्रकारचे स्वातंत्र्य नागरिकांना देण्यात आलेले आहे. भारतीय संविधानात देण्यात आलेले स्वातंत्र्य अर्निबंध किंवा अमर्याद नसून त्यावर काही प्रतिबंध घातल्यामुळे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्रस्थापित होण्यास मदत झालेली आहे.

**समता** :

समता म्हणजे सारखेपणा नसुन मानवतानिर्मीत विषमता नष्ट करणे. भारतीय संविधानाच्या सरनाम्यात समता या तत्वाचा स्विकार करण्यात आला आहे. समता म्हणजे समान संधी असेल. भारतीय राज्यघटेतील कलम १४ ते १८ मध्ये नागरीकांना समतेचा मूलभूत हक्क् देऊन धर्म, वंश, जात, भाषा, लिंग या कारणावरुन संधी नाकारली जाणार नाही. सर्वांना कायद्यासमोर समान मानुन कायद्याचे समान संरक्षण व समानतेची वागणुक दिली जाईल. श्रीमंत व गरीब व्यक्तींना एकच मत असेल. कायद्यासमोर सर्व समान असतील. नोकरीची संधी सर्वांना समान पध्दतीने दिली जाईल. अनूसुचित जाती-जमाती साठी राखीव जागा समानता निर्माण करण्यासाठी दिल्या जातील समाजात असणारी आर्थिक व सामाजिक विषमतेमुळे त्यांना संधी मिळणार नाही. त्यामुळेच त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतुद करण्यात आली आहे.

**बंधुता** :

भारतीय संविधानाच्या सरनाम्यात व्यक्तींची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकात्मता राखणारी बंधुता निर्माण करण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे. भारतात धर्म, वंश, जात, भाषा इतर अनेक बाबतीत भेदभाव जरी दिसत असला तरी न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यावर आधारीत सामाजिक व राजकीय समानता आणावयाची आहे. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक राहतात. त्यांच्यात

धर्मवाद, भाषावाद, प्रांतवाद , जातीयवाद उदभू शकतो यांची जाणिव घटनाकारांना होती. त्यासाठी त्यांच्यात राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मता टिकविण्यासाठी बंधुभावाची गरज असते. बंधुभावाच्या भावनेमुळे समाजामध्ये एकजिन्सीपणा निर्माण होतो आणि गोष्टींवर मात करण्यासाठी बंधुत्वाची भावना वाढीस लागली पाहिजे. त्यासाठी राष्ट्राचे ऐक्य आणि एकात्मता निर्माण करण्याची गरज आहे.

**राष्ट्रीय एकात्मता** :

१९७६ मध्ये ४२ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्यघटनेच्या सरनाम्यात राष्ट्राचे ऐक्य या शब्दांऐवजी राष्ट्राचे ऐक्य व एकात्मता अशी शब्द योजना टाकलेली आहे. देशात प्रांतवाद व धर्मवाद उफाळून येऊ नये आणि राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाऊ नये यासाठी या तत्वांचा स्विकार संविधानाच्या सरनाम्यात करण्यात आला आहे. देशाची एकता आणि अखंडता राखून ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयांची आहे. तसेच देशाची अंतर्गत शक्ती व सुव्यवस्था आणि बाह्य सुरक्षेच्या दृष्ट्रीने राष्ट्रीय एकात्मता ही गरजेची आहे. जेव्हा आपण असंघटीत असतो. तेव्हा आपल्याला त्याची किंमत आर्थिक व राजकीय स्वरुपाची मोजावी लागते. यासाठी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि राष्ट्रीय सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय एकात्मतेची गरज असते. देशाच्या बळकटीकरण आणि संघटीत होण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता महत्वाची भूमिका पार पाडीत असते. एकतेशिवाय कोणताही समाज आदर्श समाजाची स्थिती साध्य करु शकत नाही. राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी भारतीय राज्यघटना राष्ट्रीय प्रतीक, राष्ट्रगीत, राष्ट्रीय सण आणि सामाजिक संयोग म्हणून राष्ट्रीय एकात्मता आणि आवश्यक त्या घटकांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. भारतीय संघराज्यातुन देशातील घटक राज्यांना बाहेर पडण्याचा अधिकार नाही. भारताची एकता व अखंडता कायम अबाधीत राहण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेच्या माध्यमातुन भारतीय संघराज्य बळकट व्हावे म्हणून घटनाकारकांनी ही उपाययोजना केली आहे.

**मूल्यमापन :**

भारतीय संविधानाचा सरनामा हा जागतिक इतर संविधानाचा सरनाम्यापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे. सरनामा हा भारतीय संविधानाचा आत्माच आहे. न्याय, स्वतंत्र्य, समता बंधुत्व या गुणांवर अधिष्ठित असलेल्या स्वतंत्र भारताच्या निर्मितीच्या भारतीयाचा दृढ निश्चय यातुन व्यक्त होतो. राष्ट्राचे ऐक्य आणि एकात्मता टिकविण्यासाठी सर्वांमध्ये भ्रातृभाव निर्माण व्हावा ही आकांक्षा सरमान्यातुन व्यक्त होते. श्री.कन्हैय्यालाल मुन्शी म्हणतात की, भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान सांगणारी जी एक राजकीय कुंडली आहे. तसेच भारतीय राज्यघटनेची गुरुकिल्ली आहे. अशा शब्दामध्ये संविधानाच्या सरनाम्याचे वर्णन केले आहे. राज्यसंस्थंचे स्वरुप राज्यसंस्थेने स्विकारलेली उद्दिष्टे घटनेचे उगमस्थान इत्यादी गोष्टीचे ज्ञान हे संविधानाच्या सरनाम्यातुन होते. तसेच भारताने स्विकारलेली सार्वभौम,

समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य पध्दती आणि न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही उद्दिष्टे यांचा समावेश सरनाम्यात केला आहे. त्यामुळे भारतीयांच्या जीवनाचा, देशाच्या शांततेच्या धोरणांचा, विकासाचा ऐक्यांचा व एकात्मतेचा तो आरसास आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची** :


1. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन पुणे २००१.
2. बाचल वि.मा., भारतीय राज्यघटना आणि व्यवहार अनिरुध्द पब्लिशिंग हाऊस पुणे २०१०
3. डॉपवार प्रमोद., डॉतुंटे विजय., भारतीय संविधान व शासन प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव २०१८
4. डॉराठी शुभांगी., भारतीय संविधानाची ओळख अथर्व पब्लिकेशन्स जळगांव , २०१७
5. डॉ.एन.इंगोले व्हि. डॉएरंडे., भारताचे शासन आणि राजकारण, कल्पना प्रकाशन, १९९८नांदेड
6. आपटे नरहर, भारतीय राज्यघटना आपटे प्रकाशन१९६०पुणे ,
7. जोशी सुधाकर, भारतीय शासन आणि राजकारण विद्या बुक्स पब्लिकेशन , २०१५औरंगाबाद
8. डॉ.डी.देवरे पी., डॉएम.विसपुते एस., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव २००६
9. डॉपाटील महेंद्र., भारतीय संविधान आणि राज्यव्यवस्था, अथर्व पब्लिकेशन्स , २०१७जळगांव
10. डॉभोगले शांताराम., भारतीय राज्यघटना विकास स्वरुप आणि राजकारण , १९९७विद्याभारती प्रकाशन लातुर